करुणा

Efforts made by SNF on
Covid war front in rural & tribal areas.

कोविड संकटकाळात ग्रामीण-आदिवासी भागातील
जनतेला एसएनएफचा उभारीचा हात.

Social Networking Forum

3rd Floor, Vitthal Charani Sankul, Off Big Bazaar, College Road, Nashik, Maharashtra- 422005
(INDIA) Phone No. : (+91) 0253-2582930 Mobile No. : (+91) 94227 69364
Website : www.socialforumindia.com Email : socialforum10@gmail.com

Efforts made by SNF on Covid war front in rural & tribal areas.

कोविड महामारीत सोशल नेटवर्किंग फोरमची जबाबदारी

ऑक्टोबर २०१९ मध्ये चीनच्या वुहान येथून कोविड १९ चा विषाणू जगभर पसरला आणि फेब्रुवारीपर्यंत भारतात येऊन पोहोचला. त्यानंतर विषाणूचा अधिक फैलाव होऊ नये म्हणून २१ मार्च २०२० ला संपूर्ण देशात अचानक लॉकडाऊन घोषित झाला. यामुळे गरीब कामगारांचे प्रचंड हाल झाले. त्यांचे रोजगार गेले, खाण्यापिण्याचे प्रश्न निर्माण झाले, लॉकडाऊनमुळे आपल्या मूळगावी जाणे कठीण झाले, मुलांचे शिक्षण थांबले. यादरम्यान उपासमारीने, आपल्यागावी भर उन्हात जाताना उष्माघाताने, अपघाताने आणि आजारांनी किती माणसांना आपले प्राण गमवावे लागले याची गणतीसुद्धा करणे अशक्य आहे. तथापि कोणत्याही संकटात मग तो दुष्काळ असो, अतिवृष्टी असो व महामारी असो, सोशल नेटवर्किंग फोरम गरीब ग्रामीण कष्टकऱ्यांच्या मदतीला नेहमीच धावून गेली आहे. तसेच याही संकटात एसएनएफच्या टिमने शक्य तितक्या संकटग्रस्त लोकांना मदत करण्याचे ठरवले आणि प्रयत्नांची पराकाष्ठा केली. आम्हाला सांगायला अभिमान वाटतो की, कोविड महामारी भारतात सुरु झाल्यापासून आजतागायत अन्नधान्य, वैद्यकीय साहित्य, शैक्षणिक साहित्य तसेच प्रबोधनाच्या माध्यमातून कुठल्या ना कुठल्या स्वरूपात किमान एक लाख कष्टकरी लोकांना सोशल नेटवर्किंग फोरमने मदत केली आहे. एवढेच नव्हे तर आमच्या कार्याची कक्षा यावेळी आम्ही राज्याबाहेरही रुंदावत काश्मीरच्या कुपवाडा विभागाच्या स्थानिक नागरिकांसाठी भारतीय सेनेच्या मराठा बटालियनने उभारलेल्या कोविड सेंटरलाही वैद्यकीय साहित्य आणि खाद्यतेलाच्या सामग्रीचा ट्रक पाठवला. या संपूर्ण कामात आमच्या आवाहनाला प्रतिसाद देत देशविदेशातील बांधव, संस्था आणि शासकीय तसेच खाजगी आस्थापने यांचे अमूल्य योगदान लाभले आहे. या लोकसहभागातून देणगी आणि वस्तू स्वरूपातील मदत मिळून अंदाजे दोन कोटी मूल्याची मदत आम्ही ग्रामीण–आदिवासी भागात करू शकलो आहोत हे आवर्जून नमूद करतो. एवढेच नव्हे तर भारतातून कोरोना हद्दपार होईपर्यंत आम्ही आमच्या या प्रयत्नात कटिबद्ध राहण्याचा निश्चयही केला आहे. कोविड संकट काळात सोशल नेटवर्किंग फोरम टिमच्या खांद्याला खांदा लावून आमचे शेकडो सदस्य, समन्वयक, देणगीदार आणि मदतकर्त्यांचे आम्ही ऋणी आहोत. यासोबत आमच्या उपक्रमांची दखल घेऊन ते जनतेपर्यंत पोहचवण्यात आणि लोकसहभाग वाढवण्यात मोलाचा सहयोग देणाऱ्या प्रसार माध्यमांचेही धन्यवाद.

- प्रमोद गायकवाड
संस्थापक अध्यक्ष,
सोशल नेटवर्किंग फोरम
मोबा – ९४२२७६९३६४

Responsibility for the Social Networking Forum on the Covid Epidemic

In October 2019, the Covid 19 virus spread around the world from Wuhan, China, and reached India by February 2020. sudden lockdown was declared across the country on March 21, 2020 to prevent further spread of the virus. During this time the poor workers suffered greatly. They lost their jobs, food problems arose, lockdown made it difficult to return to their hometowns and children's education stopped. Meanwhile, it is impossible to count the number of people who lost their lives due to starvation, heat stroke, accidents and diseases while going to their village in extremely hot summer. However, in any crisis, be it drought, heavy rains or epidemics, the Social Networking Forum has always rushed to the aid of poor rural laborers. Similarly in this crisis also, the SNF team decided to help as many people in distress as possible and tried our best to make every effort to reach needy people in last some months. Today, We are proud to say that since the beginning of the Covid epidemic in India, the Social Networking Forum has helped at least one lakh working people in one form or another through food, medical aid, educational materials and awareness. Not only this, we also expanded our scope of work outside the state by sending medical supplies and edible oil to the Covid Center set up by the Maratha Battalion of Indian Army for local residents in Kupwada division of Kashmir. In this whole work, invaluable contribution has been made by brothers, organizations and government as well as private establishments in response to our call. It is worth mentioning that through this public participation, we have been able to provide assistance in the form of donations and in the form of goods worth about Rs 2 Crores. Not only that, but we are determined to remain committed to this endeavor until Covid is deported from India. We are indebted to the hundreds of our members, coordinators, donors and helpers who have stood shoulder to shoulder with the Social Networking Forum team during the Covid crisis. Thanks also to the media for their invaluable contribution in bringing our initiatives to the masses and increasing public participation.

- Pramod Gaikwad
Founding President,
Social Networking Forum
Mob - 9422769364

Supply of food grains to 35,000 tribal laborers

३५,००० आदिवासी कष्टकऱ्यांना अन्नधान्याची रसद

Efforts made by SNF on Covid war front in rural & tribal areas.

भारतात कोविड विषाणूचा अधिक फैलाव होऊ नये म्हणून २१ मार्च २०२० ला संपूर्ण देशात अचानक लॉकडाऊन घोषित झाला. या सर्व घडामोडीत संपूर्ण देशातील कोट्यावधी असंघटित क्षेत्रातील कामगारांचा रोजगार बुडाला. यात खेड्यापाड्यातील मजूरवर्गाचा मोठ्या प्रमाणात समावेश होता. रोजच्या भाजीभाकरीचे साधनच नष्ट झाल्याने लाखो लोकांच्या चुली बंद झाल्या. अशा वेळी सोशल नेटवर्किंग फोरमने या कष्टकऱ्यांना शासकीय मदत मिळेपर्यंत अन्नधान्याचा पुरवठा करण्याचे ठरवले. या कामात लोकसहभाग उभारण्यासाठी समाजमाध्यमांवर आवाहन करण्यात आले. फोरमच्या या आवाहनाच्या उदंड प्रतिसाद मिळाला. त्यातून अल्पावधीतच देशविदेशातील शेकडो लोकांनी आणि संस्थांनी कित्येक ट्रक तांदूळ, गहू, डाळी, तेल, मिरची-मसाले, मीठ, चहा, साखर यासारखे जीवनावश्यक अन्नधान्य जमा करून दिले. जमा झालेले हे संपूर्ण साहित्य नाशिक जिल्ह्यात ६ तालुक्यातील ३५,००० कष्टकऱ्यांना त्वरित वितरित करण्यात आले. या साहित्याच्या वितरणासाठी एसएनएफ तालुका आणि ग्रामसमनव्यक, तहसीलदार, बीडीओ, इतर शासकीय अधिकारी, ग्रामसेवक यांचे मोठे सहकार्य झाले आणि गरजूंपर्यंत योग्य वेळी मदत पोहोचली.

संस्था आणि समाजमाध्यमांचे सहकार्य

- दैनिक भास्कर/ दिव्य मराठी समूह (७ ट्रक किराणा साहित्य)
- रिअल डायनॅमीक्स, अमेरिका
- जीएसटी अधिकारी संघटना आणि
- वैयक्तिक देणगीदार.

सोशल नेटवर्कींग फोरम अभियानात अमेरीकेतील बांधवांनी केली ५ लाखांच्या अन्नधान्याची सोय

संचारबंदीमूळे काम बंद झालेल्या अकरारो कष्टकरी कुटूंबाच्या पोटाची चिंता मिटली

पेठ । प्रतिनिधी

दिव्य मराठी विशेष • अमेरिकेतील बांधवांनी पाठवलेल्या पाच लाख रुपयांच्या मदतीतून अन्नधान्याची सोय

सोशल नेटवर्किंगतर्फे ११०० कष्टकऱ्यांना मदत

Efforts made by SNF on Covid war front in rural & tribal areas.

लोकसत्ता

viva

प्रकाशबीजे रुजवीत चाललो...

Transportation arrangement for thousands of migrants to return to their hometowns.

हजारो स्थलांतरितांना आपापल्या गावी परतण्यास वाहनांची सोय.

कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर मार्च २०२० मध्ये लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे ग्रामीण भागातून रोजगारासाठी शहरात स्थलांतरित झालेले लोक भरडले गेले. त्यांना शहरात थांबून कुटुंबाच्या रोजीरोटीचा प्रश्न सोडवणेही शक्य नव्हते आणि रस्ते बंद असल्याने आपापल्या गावी परतणेही शक्य नव्हते. अशा परिस्थितीत उपाशीपोटी आपल्या छोट्या छोट्या लेकरांना घेऊन हे कष्टकरी देशातील शहरांमधून गावाकडे पायीच निघाले. ऐन उन्हाळ्यात अनवाणी पायाने निघालेल्या मजुरांच्या जथ्थ्यांनी महामार्ग भरून गेले. त्यांच्या या हालअपेष्टा बघून सोशल नेटवर्किंग फोरमने शक्य तितक्या दुर्दैवी लोकांना वाहन उपलब्ध करून देण्याचे ठरवले. इगतपुरीपासून ते ओझरपर्यंतच्या रस्त्यावरील पायी चालणाऱ्या हजारो पर प्रांतीय लोकांना एकत्र करून त्यांना जमेल तसे वाहन मिळवून देण्यासाठी फोरमच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. याबरोबरच नाशिकसह निफाड, लासलगावसारख्या बागायती भागात तसेच नगर जिल्ह्यात शेतमजुरी करणाऱ्या लोकांना आदिवासी भागातील आपापल्या गावी पोहोचवण्यासाठी खाजगी वाहनांची व्यवस्था करून दिली. ठाणे जिल्ह्यातील जव्हार भागातील अनेक तरुण कलकत्त्याकडे रोजगारासाठी गेले होते. ते तिकडेच अडकले. या लोकांनाही खाजगी बसने आपल्या गावांना पोहोचवण्यात आले.

सहकार्य :

- या कामात नाशिक मधील खाजगी ट्रान्सपोर्ट व्यावसायिक, कोलकत्याचा बस व्यावसायिक आणि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अमूल्य असे सहकार्य मिळाले.
- श्री. नितीन मुंडावरे, उपजिल्हाधिकारी, नाशिक
- श्री. नितीन मैंद, विभागीय अधिकारी, राज्य परिवहन मंडळ

Assistance of Educational Materials to 30,000 School children.

३०,००० शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत.

Efforts made by SNF on Covid war front in rural & tribal areas.

कोविडच्या जागतिक संकटामुळे ग्रामीण भागातील मुलांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान झाले. शाळाही बंद आणि पालकांचे रोजगार गेल्याने शैक्षणिक साहित्य घेणेही शक्य नाही अशा द्विधा परिस्थितीत विद्यार्थी अडकले. या समस्येवर उपाय म्हणून लोकसहभागातून नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, त्रंबकेश्वर, दिंडोरी आणि नाशिक तालुत्यातील ३०,००० विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल, रबर, ड्रॉईंग बुक्स, रंगपेट्या आणि इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरवले.

सहकार्य :

- अस्ट्रॉल फाऊंडेशन, गुजराथ
- अलकॉन इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि.
- आरटीओ अधिकारी
- समाजमाध्यमांवरील आवाहनाला प्रतिसाद देत मदत करणारे देणगीदार

ऑनलाइन शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

सोशल नेटवर्किंग फोरमचा उपक्रम

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : करोनाचे संकट वाढत असताना पेठ तालुक्यातील वाडी, वस्तीवर शाळा बंद आहेत. या मुलांना भ्रमणध्वनी अभावी ऑनलाइन शिक्षणाचे दुरापास्त झाले आहे. अशा परिस्थितीत ३० वाड्यांमध्ये घरापर्यंत अभ्यास करणाऱ्या मुलांसाठी सोशल नेटवर्किंग फोरमने शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले.

हे साहित्य फोरमच्या ग्रामसमन्वयकांनी (एसएनएफ) संकट काळात सामाजिक जबाबदारी निभावत जवळपास तीन हजार बालकांच्या घरापर्यंत पोहचवले.

फोरमचे संस्थापक अध्यक्ष प्रमोद रायकवाड यांच्या संकल्पनेतून आणि पेठ तालुका समन्वयक रामदास शिंदे यांच्या पुढाकाराने गाव तेथे एसएनएफ या अभियानात शाखागणात सामाजिक कार्याची उर्मी असलेल्या युवकांना एकत्र करून भक्कम फळी तयार करण्यात आली. याच ग्राम समन्वयकांचे आयोजन, नियोजन आणि संयोजनातून शैक्षणिक साहित्य वाटपाची मोहीम यशस्वी करण्यात आली.

पेठमधील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

व्यवसायीतावरून युवा ग्राम समन्वयकांनी आपली जबाबदारी उत्तम रितीने बजावत अभ्यासाच्या वेळू भविष्यांना ज्ञानार्जनासाठी साहित्य पोहचविले.

फोरमचे प्रमुख रायकवाड यांनी एसएनएफ ग्रामसमन्वयक संकल्पना विषद केली. आदिवासी भागात आरोग्य, शिक्षण आणि पाण्याच्या अनेक समस्या असतात. या समस्या येऊनेस फोरमपर्यंत पोहोचल्या तर त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करता येतात.

यासाठी गाव तिथे ग्रामसमन्वयक ही संकल्पना आम्ही राबवली आहे. आनंदाची बाब म्हणजे या समन्वयकांकडून अनेक समस्या आमच्यापर्यंत पोहोचू लागल्या आहेत. त्यांचेकडे काही सोडवण्यातही फोरम यशस्वी ठरत आहे. उत्तरेखडीय गाव म्हणजे पेठ, त्र्यंबकेश्वर आणि सुरगाणा तालुक्यातील अनेक तरुणांनी या सामाजिक कार्यात स्वयंस्फू तीने सहभाग नोंदवला आहे.

Efforts made by SNF on Covid war front in rural & tribal areas.

Safety materials for 8,000 Rural Health Workers.

८००० ग्रामीण आरोग्य सेवकांना सुरक्षा साहित्य.

कोविडच्या दुसऱ्या लाटेत ग्रामीण भागातील जनतेच्या वैद्यकीय सुविधांभावी प्रचंड हाल झाले. हॉस्पिटल्स आणि कर्मचाऱ्यांचीही कमतरता होती. अशात अनेकांना कोरोनाची लागण झाली. यात कोणत्याही सुरक्षा साहित्यविना गावोगावी आरोग्य सेवा देणाऱ्या आशा, अंगणवाडी सेविका आणि ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारीही मोठ्या प्रमाणावर बाधित झाले. त्यामुळे या आरोग्यसेवकांच्याच आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. त्यांच्या जीवाला धोका म्हणजेच स्थानिक जनतेच्या जीवाला धोका आहे हे ओळखून सोशल नेटवर्किंग फोरमने गावोगावी सर्वेक्षण करणाऱ्या, वैद्यकीय सेवा देणाऱ्या आरोग्य सेवकांना कोविड सुरक्षा साहित्य देण्याचे ठरवले. या अंतर्गत आरोग्य सेवकांना फेस शिल्ड्स, सॅनिटायझर्स, हँडग्लोव्हस, मास्क्स सेट असे साहित्य पुरवण्यात आले. या साहित्याचा नियमित वापर झाल्याने अनेक आरोग्यसेवक कोविड बाधित होण्यापासून वाचले.

संस्था आणि समाजमाध्यमांचे सहकार्य

- रचना ट्रस्ट
- जेनीक्स इंजिनीयरींग
- एबीबी लि.
- वैयक्तिक देणगीदार

कार्यवाही दखल • एक हजार कर्मचाऱ्यांना मास्क, सॅनिटायझर, फेसशिल्ड वाटप

सोशल नेटवर्किंग फोरमतर्फे कोरोना योद्ध्यांचा सन्मान

प्रतिनिधी | नाशिक

आदिवासी भागात सुरक्षा साहित्य वाटप

रचना ट्रस्ट आणि जेनिक्स इंजिनिअरिंगकडून चार लाखांची मदत

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

येथील सोशल नेटवर्किंग फोरम संस्थेतर्फे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण आणि आदिवासी भागातील हजारो लोकांना आरोग्य आणि इतर सुविधा पुरवत आहे. यातच रचना ट्रस्ट आणि जेनिक्स इंजिनिअरिंगकडून चार लाखांचे सुरक्षा साहित्य पुरविण्यात येणार आहे.

कोविडच्या दुसऱ्या लाटेसाठी ग्रामीण भागातील दहा हजार आरोग्यसेवकांना वैद्यकीय सुरक्षा साहित्य पुरवण्याचा निर्णय सोशल नेटवर्किंग फोरमने (एसएनएफ) घेतला. नाशिकची सेवाभिक संस्था रचना ट्रस्ट आणि जेनिक्स इंजिनिअरिंग प्रा. लि. यांनी

नाशिक : दिंडोरी येथील कोविड सेंटरमधील आरोग्य कर्मचाऱ्यांना कोविड सुरक्षा साहित्य प्रदान करताना सोशल नेटवर्किंग फोरमचे पदाधिकारी व कार्यकर्ते.

“ दुर्गम आदिवासी भागातील लोकांची परिस्थिती बिकट असल्याने तेथील आरोग्यसेवकांना सुरक्षेसाठी आणि रुग्णांसाठी सुविधा उपलब्ध करून दिल्याचे समाधान आहे.
- डॉ. हेमंत कोतवाल, रचना ट्रस्ट

“ खेडापाड्यातील लोकांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या यात्रातदीकरीत १० हजार आरोग्यसेवकांपर्यंत कोविड सुरक्षा साहित्य आम्ही पोहोचवणार आहोत.
- प्रमोद गायकवाड, एसएनएफ

Medical supplies to 9 Covid Centers in tribal areas (585 Beds)

Efforts made by SNF on Covid war front in rural & tribal areas.

आदिवासी भागातील ९ कोविड सेंटर्सला वैद्यकीय साहित्य (५८५ बेड्स)

कोविडच्या दुसऱ्या लाटेत आदिवासी भागही भरडला गेला. मात्र या भागात खाजगी हॉस्पिटल्सची अनुपलब्धता आणि ग्रामीण ऋग्णालयातील आरोग्य सुविधांच्या कमतरतांमुळे कोविड बाधितांचे अतिशय हाल झाले. यासाठी प्रशासन, सामाजिक संस्था आणि स्थानिक लोकांच्या सहकार्याने तात्पुरते कोविड उपचार केंद्र सुरु करण्यात आले. लोकसहभागातून सुरु झालेल्या या केंद्रांवर अर्थातच सुविधांचा अभाव होता. येथील डॉक्टर्स, नर्सेस अतिशय धोक्याच्या अवस्थेत ऋग्णांना सेवा देत होते. तथापि त्यांची सुरक्षा ही अतिशय महत्वाची असल्याने सोशल नेटवर्किंग फोरमने या कोविड सेंटर्सवरील डॉक्टर्स, नर्सेस आणि कर्मचाऱ्यांना पीपीई किट्स आणि इतर आवश्यक सुरक्षा साहित्य पुरवले. यासोबतच कोविड पेशंट्ससाठी वाफेचे महत्व लक्षात घेऊन उपलब्ध बेड्सनुसार सर्व सेंटर्सवरील पेशंट्सला वाफेचे मशिन्स उपलब्ध करून देण्यात आले.

सहकार्य :

समाजमाध्यमांवरील आवाहनाला प्रतिसाद देत मदत करणारे देणगीदार

बोरगाव केंद्रास सुरक्षा साहित्य प्रदान करताना पदाधिकारी.

नाशिकमधील 'सोशल नेटवर्किंग फोरम'चा उपक्रम

करोना योद्धयांच्या रक्षणार्थ सक्रिय पुढाकार

अनिकेत साठे, लोकसत्ता

नाशिक : सर्वसामान्य नागरिकांचे, त्यातही दुर्गम भागातील आदिवासींचे करोना संसर्गापासून संरक्षण करण्यासाठी अत्यल्प मानधनावर जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांची काळजी कोणीतरी घ्यायला हवी, पण कोणीतरी म्हणजे नक्की कोणी? असा प्रश्न दुसऱ्या लाटेत उभा राहिला. त्याचे उत्तर नाशिकमधील 'सोशल नेटवर्किंग फोरम' या संस्थेने कृतीतून दिले आहे. आदिवासी पाड्यांपासून वाडीवस्त्यांपर्यंत संस्थेने मदत पोहोचवली आहे.

कर्मचाऱ्यांना मदत करताना सोशल नेटवर्किंग फोरमचे कार्यकर्ते.

पहिल्या लाटेत काहीसा सुरक्षित राहिलेला आदिवासी परिसर दुसऱ्या लाटेच्या विळख्यात सापडला. आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्यावर सरकारने करोना नियंत्रणाची बरीच कामे सोपवली, पण सुरक्षा साधने दिली नाहीत. परिणामी, घरोघरी सर्वेक्षण, तापमापन करताना त्यांपैकी अनेक बाधित झाले. परिसरातील करोना उपचार केंद्रांवरही आरोग्य सेवक, परिचारिका संरक्षक संचाविना (पीपीई किट) काम करीत होते. 'सोशल नेटवर्किंग फोरम'ने त्यांना संरक्षक संच देण्याचे ठरवले.

करोना नियंत्रण आणि उपचार या दोन्ही आघाड्यांवर काम करणाऱ्या योद्धयांचे रक्षण करण्यासाठी फोरमने दानशूरांना आवाहन केले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. पाच तालुक्यांतील आशा, अंगणवाडी सेविका, मदतनीस, पोलीस अशा सुमारे पाच हजार जणांना चेहरा संरक्षक (फेसशिल्ड), मुखपट्टी, सॅनिटायझर आदी संरक्षक साधने देण्यात आली.

या भागात नऊ करोना उपचार केंद्रे आहेत. तेथील परिचारिका, आरोग्य सेवक होती (पान ४ वर)

सोशल नेटवर्किंगतर्फे बोरगाव केंद्रास सुरक्षा साहित्य वाटप

प्रतिनिधी | बोरगाव

सुरगाणा तालुक्यातील बोरगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी सोशल नेटवर्किंग फोरम, स्थान ट्रस्ट, जेनिक्स इंजिनिअरिंग प्रा. लिमिटेड यांच्या माध्यमातून बोरगाव आरोग्य केंद्रातील वेगवेगळ्या ३५ गावांतील आशावर्कर, अंगणवाडीसेविका व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांना केमशिल्ड, सॅनिटायझर, मास्क, थेर्मामीटर आदी सुरक्षा साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. कैलास निकाळकर, डॉ. प्रफुल्ल उमाळे, डॉ. सोनाली मिसाळ व कर्मचारी एम. के. भोये, शशांक पवार, आर. एम. चौधरी, संतोष मारवि, एल. जी. गांगुर्डे, एच. सिंदे, टी. के. गांगुर्डे, वंदना सपकाळ, सोशल नेटवर्किंग फोरमच्या वतीने देण्यात आलेल्या साहित्यात ५०० केमशिल्ड, ३०० मास्क, ५०० सॅनिटायझर, २ थेर्मामीटर यांचा समावेश आहे.

अशोक बिंदू, ताता गावडे, हरणदास वेळीस पोलिसपाटील गणेश जाधव, चारस जाधव, वामन गवळी, देवीदास दळवी, सोशल नेटवर्किंग फोरमचे समन्वयक डॉ. योगेश पाटील उपस्थित होते. धुळवी, मनखेड, बोरगाव, अंबुपाडा, सुरगाणा कोविड सेंटर, उंबरठाण (सु.) येथील कोविड सेंटर येथे सुरक्षा साहित्य वाटप करण्यात आले. उर्वरित चार प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन दिवसांत वाटप करण्यात येणार आहे.

Efforts made by SNF on Covid war front in rural & tribal areas.

Medical and Edible Oil assistance to Covid Center in Kashmir

काश्मीर मधील कोविड सेंटरला वैद्यकीय आणि खाद्यतेलाची मदत

काश्मीर मध्ये तैनात असलेल्या मराठा आर्मी बटालीयनने कोविडच्या संकटकाळात तिथल्या स्थानिकांसाठी मदतकार्य सुरू केले. त्याअंतर्गत लोकसहभागातून एक कोवीड सेंटर उभे करणे आणि रोजगार नसलेल्यांना अन्नधान्य ऊपलब्ध करायचे ठरवले. तेथील कर्नल प्रणय पवार यांनी या कार्यात सोशल नेटवर्कींग फोरम मदत करेल का म्हणून विचारले. सोबत आवश्यक वस्तूंची यादीही पाठवली. या आवाहनाला प्रतिसाद देत नाशिकच्या सोशल नेटवर्किंग फोरमने कोविडकाळात नेब्युलायझर्स, ऑक्सिजन ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर्ससह इतर वैद्यकिय साहित्य आणि खाद्यतेलाची ट्रक काश्मीरच्या कुपवाडा विभागात रवाना केली. या मदतीबद्दल स्थानिक काश्मिरी रहिवासी आणि आर्मीच्या वतीने फोरमला धन्यवाद देण्यात आले.

सहकार्य :

- भारतीय सेनेची मराठा बटालियन, कुपवाडा विभाग
- ६० नेब्युलायझर्स – अनिवासी भारतीय बांधव
- १००० किलो तेल – रचना ट्रस्ट
- १० ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर्स – मराठा चेंबर ऑफ कॉमर्स
- अन्य वैद्यकीय साहित्य – वैयक्तिक देणगीदार

कोरोना संकटात नाशिकमधून थेट काश्मिरी बांधवांना मदत

वैद्यकीय साहित्य, खाद्यतेलाचा ट्रक रवाना

नाशिक-पुणेकरांची काश्मीर बांधवांना मदत

वैद्यकीय साहित्य अन् खाद्यतेलाचा ट्रक जम्मूकडे रवाना

नाशिक : कोरोना संकटाच्या काळात वैद्यकीय साहित्य आणि खाद्यतेलाचा जम्मू-काश्मीरकडे रवाना झालेल्या ट्रकसमवेत प्रमोद गायकवाड.

मदतकार्याबद्दल आभार व्यक्त

एसएनएफतर्फे काश्मिरी बांधवांना इन्क्युबेटर, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर

कोविड संकटात वैद्यकीय साहित्य, खाद्यतेलासह ट्रक जम्मूला रवाना

प्रतिनिधी | नाशिक

लष्करी सेवेत असलेले कर्नल प्रणय पवार यांनी कोविडच्या संकटात काश्मीरमध्ये मदतकार्य सुरू केले आहे. या उपक्रमात मदत म्हणून नाशिकच्या सोशल नेटवर्किंग फोरमच्या माध्यमातून मदत पाठविण्यात आली. नाशिकसह पुणे, अमेरिका, मस्कत, दुबई, अबुधाबी, आयर्लंड येथील अनेकांचे योगदान लाभले. यात कोविड सेंटरसाठी ६० इन्क्युबेटर मशीन्स, एक हजार किलो तेलाचे पॅकेट्स, १० ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर्स मशीनसह वैद्यकीय साहित्याचा समावेश आहे.

फोरमचे अध्यक्ष प्रमोद गायकवाड यांचे मित्र मराठा बटालियनचे इन्चार्ज कर्नल प्रणय पवार यांची सध्या काश्मीरमध्ये पोस्टिंग आहे. त्यांच्या बटालियनने

सोशल नेटवर्किंग फोरमच्या वतीने काश्मीरला पाठविण्यात आलेली मदत.

माजी विद्यार्थी आले एकत्र

या उपक्रमात एक समान धागा औरंगाबाद येथील सर्व्हिसेस ब्रिपेरेटरी इन्स्टिटयूट ही संस्था ठरली. या संस्थेचे प्रमोद गायकवाड, कर्नल प्रणय पवार आणि पुण्यातील संतोष कोद्रक हे तिघेही माजी विद्यार्थी आहेत. सोशल मीडियावर एकत्र येऊन परदेशातील बांधवांच्या मदतीने नाशिक-पुणे ते काश्मिरी बांधवांपर्यंतच्या मदतकार्याची एक शृंखला पूर्णही झाली.

Efforts made by SNF on Covid war front in rural & tribal areas.

Employment for laborers from Rural areas in Government schemes

गाव खेड्यांमध्ये कष्टकऱ्यांसाठी शासनाच्या मदतीने रोजगार निर्मिती

दुसऱ्या लॉकडाऊन नंतरही ग्रामीण भागातील लोकांचे रोजगार मोठ्या प्रमाणावर बुडाले. यावेळी शासनाने आधी कल्पना दिल्याने लोकांचे जास्त हाल झाले नाहीत मात्र त्यांच्या चरितार्थाचा प्रश्न निर्माण झालाच. या समस्येवर उपाय म्हणून एसएनएफ ग्रामसमन्वयकांच्या माध्यमातून शासनाच्या रोजगार हमीच्या योजनांचा लाभ स्थानिक रहिवाशांना मिळावा आणि त्यातून त्यांच्या चूल पेटवण्याचा प्रश्न सुटावा यासाठी काही गावात प्रबोधन करण्यात आले. स्थानिक ग्रामसेवक / रोजगार प्रतिनिधी यांच्या माध्यमातून पाठपुरावा करून लोकांना अर्थार्जनाचे साधन मिळवून देण्यात साहाय्य करण्यात आले.

सहकार्य : • एसएनएफ ग्रामसमन्वयक

Discussion sessions in tribal dialect for vaccination and treatment

लसीकरण आणि उपचारासाठी आदिवासी बोलीभाषेत प्रबोधन चर्चासत्र

कोविड विषाणूने जशा वैद्यकीय आणि चरितार्थाच्या समस्या निर्माण केल्या तशा अनेक सामाजिक समस्याही निर्माण केल्या. आदिवासी भागात लसीकरण आणि उपचारासंबधी अनेक अंधश्रद्धा निर्माण झाल्या. लस घेतली, की माणसं मरतात अशी अफवा पसरली. त्यात कोविड बाधित लोकांनी उपचारासाठी सेंटरवर किंवा ग्रामीण रुग्णालयात जाणे बंद केले. त्यामुळे काही लोकांना प्राण गमवावे लागले. यावर उपाय म्हणून सोशल नेटवर्किंग फोरमच्या ग्रामसमन्वयकांनी आपल्या भागात लोकांचे प्रबोधन सुरु केले. यासोबतच आदिवासी भागातील उच्चशिक्षित तरुणांना एकत्र करून स्थानिक बोलीभाषेत प्रबोधनाचे ऑनलाइन सेमिनार आयोजित केले. गावगावच्या शिक्षित तरुणांनी लॅपटॉप किंवा मोबाईलवर हे सेमिनार गावातील लोकांना ऐकवले. यासोबतच हे व्हिडीओ युट्युबवर अपलोड करून ग्रामीण भागातील व्हॉटस अप ग्रुपसवर ब्रॉडकास्ट करण्यात आले. त्यामुळे या भागातील अफवांवर आळा बसण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली.

सहकार्य :

- एसएनएफ तालुका समन्वयक
- आदिवासी भागातील उच्च शिक्षित तरुण

नाशिक : शेवखंडी येथे तरुणांच्या प्रयत्नांतून लसीकरण मोहीमेचे प्रारंभ.

शेवखंडी येथे तरुणांच्या प्रयत्नांतून १०० लोकांच्या हातांना काम

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

कोरोना महामारीमुळे गावा गावातील चाकरमान्यांना रोजीरोटीची सोय दिसणे मोठ्या अवघड उपाययोजनांची वेळ आली आहे. पण, इच्छाशक्ती आणि सकारात्मक उपाय हा असावा, असाच विचार करणारी आदिवासी तरुणांची एक टीम शेवखंडी गावात आहे.

खोलगा नेटवर्किंग फोरमचे दक्षिण गडचिरोलीतील तालुकास्तरीय समन्वयक रोजीरोटीची सोय दिसणे मोठ्या अवघड उपाययोजनांची वेळ आली आहे. पण, इच्छाशक्ती आणि सकारात्मक उपाय हा असावा, असाच विचार करणारी आदिवासी तरुणांची एक टीम शेवखंडी गावात आहे.

खोलगा नेटवर्किंग फोरमचे दक्षिण गडचिरोलीतील तालुकास्तरीय समन्वयक रोजीरोटीची सोय दिसणे मोठ्या अवघड उपाययोजनांची वेळ आली आहे. पण, इच्छाशक्ती आणि सकारात्मक उपाय हा असावा, असाच विचार करणारी आदिवासी तरुणांची एक टीम शेवखंडी गावात आहे.

खोलगा नेटवर्किंग फोरमचे दक्षिण गडचिरोलीतील तालुकास्तरीय समन्वयक रोजीरोटीची सोय दिसणे मोठ्या अवघड उपाययोजनांची वेळ आली आहे. पण, इच्छाशक्ती आणि सकारात्मक उपाय हा असावा, असाच विचार करणारी आदिवासी तरुणांची एक टीम शेवखंडी गावात आहे.

खोलगा नेटवर्किंग फोरमचे दक्षिण गडचिरोलीतील तालुकास्तरीय समन्वयक रोजीरोटीची सोय दिसणे मोठ्या अवघड उपाययोजनांची वेळ आली आहे. पण, इच्छाशक्ती आणि सकारात्मक उपाय हा असावा, असाच विचार करणारी आदिवासी तरुणांची एक टीम शेवखंडी गावात आहे.

खोलगा नेटवर्किंग फोरमचे दक्षिण गडचिरोलीतील तालुकास्तरीय समन्वयक रोजीरोटीची सोय दिसणे मोठ्या अवघड उपाययोजनांची वेळ आली आहे. पण, इच्छाशक्ती आणि सकारात्मक उपाय हा असावा, असाच विचार करणारी आदिवासी तरुणांची एक टीम शेवखंडी गावात आहे.

खोलगा नेटवर्किंग फोरमचे दक्षिण गडचिरोलीतील तालुकास्तरीय समन्वयक रोजीरोटीची सोय दिसणे मोठ्या अवघड उपाययोजनांची वेळ आली आहे. पण, इच्छाशक्ती आणि सकारात्मक उपाय हा असावा, असाच विचार करणारी आदिवासी तरुणांची एक टीम शेवखंडी गावात आहे.

खोलगा नेटवर्किंग फोरमचे दक्षिण गडचिरोलीतील तालुकास्तरीय समन्वयक रोजीरोटीची सोय दिसणे मोठ्या अवघड उपाययोजनांची वेळ आली आहे. पण, इच्छाशक्ती आणि सकारात्मक उपाय हा असावा, असाच विचार करणारी आदिवासी तरुणांची एक टीम शेवखंडी गावात आहे.

खोलगा नेटवर्किंग फोरमचे दक्षिण गडचिरोलीतील तालुकास्तरीय समन्वयक रोजीरोटीची सोय दिसणे मोठ्या अवघड उपाययोजनांची वेळ आली आहे. पण, इच्छाशक्ती आणि सकारात्मक उपाय हा असावा, असाच विचार करणारी आदिवासी तरुणांची एक टीम शेवखंडी गावात आहे.

खोलगा नेटवर्किंग फोरमचे दक्षिण गडचिरोलीतील तालुकास्तरीय समन्वयक रोजीरोटीची सोय दिसणे मोठ्या अवघड उपाययोजनांची वेळ आली आहे. पण, इच्छाशक्ती आणि सकारात्मक उपाय हा असावा, असाच विचार करणारी आदिवासी तरुणांची एक टीम शेवखंडी गावात आहे.

खोलगा नेटवर्किंग फोरमचे दक्षिण गडचिरोलीतील तालुकास्तरीय समन्वयक रोजीरोटीची सोय दिसणे मोठ्या अवघड उपाययोजनांची वेळ आली आहे. पण, इच्छाशक्ती आणि सकारात्मक उपाय हा असावा, असाच विचार करणारी आदिवासी तरुणांची एक टीम शेवखंडी गावात आहे.

सोशल नेटवर्किंग फोरमतर्फे वेबिनार

नाशिक, ता. २ : आदिवासी भागात कोविड लस आणि उपचारासंबंधी असलेले गैरसमज दूर करण्यासाठी सोशल नेटवर्किंग फोरमतर्फे 'चला करोनाला हरवू या' या संकल्पनेवर आधारित गुगल मीटद्वारे हा वेबिनार झाला. लागण झाल्यावर वेळीच उपचार तसेच कोरोनाची बाधा होऊ नये म्हणून लसीकरण महत्त्वाचे असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.

ग्रामीण भागातील लोकांमधील भीती आणि गैरसमज दूर करण्यासाठी फोरमचे संस्थापक प्रमोद गायकवाड यांच्या संकल्पनेतून वेबिनार झाला. डॉ. उद्धव चौधरी यांनी 'कोविड लस समज- गैरसमज' याविषयावर मार्गदर्शन केले. यशस्वितेसाठी रामदास शिंदे, संदीप बत्तासे, विजय भरसट, डॉ. नीलेश पाटील, जयदीप गायकवाड, संदीप डगळे आदींनी सहकार्य केले.

Efforts made by SNF on Covid war front in rural & tribal areas.

Team Social Networking Forum on Covid war front

प्रत्यक्ष कोविड युद्धभूमीवर लढणारे सोशल नेटवर्कींग फोरमचे योद्धे

प्रमोद गायकवाड

डॉ. पंकज भदाणे

इंजि. प्रशांत बच्छाव

कॅप्ट. निलेश गायकवाड

रामदास शिंदे

संदीप बत्तासे

विजय भरसट

डॉ. निलेश पाटील

जयदिप गायकवाड

जीवन सोनवणे

डॉ. हेमंत कोतवाल

योगेश कासट

राजेश बक्षी

डॉ. उत्तम फडताळे

संदीप डगळे

* संस्थांचे योगदान *

रिअल डायनॅमीक्स, अमेरिका
जेनीक्स इंजिनीयरींग
अल्कॉन इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि.

जीएसटी अधिकारी संघटना
एबीबी लि.
ॲस्ट्रॉल फाऊंडेशन

रचना ट्रस्ट
दैनिक भास्कर / दिव्य मराठी समूह
ॲडव्हान्स एन्झाईम्स

* अनिवासी भारतीयांचे योगदान *

योगेश कासट, अमेरिका
चंद्रशेखर महाले, अमेरीका
विजय दुबे, मस्कत

राजेश बक्षी, मस्कत
आबुधाबी मारवाडी सेवा संघ
राहूल मोहता, अमेरिका

माधव पाटणकर, आबुधाबी
शिरीष इंगवले, अमेरीका
योगेश पाटील, ऑस्ट्रेलिया

Angels responded to SNF's appeal in COVID Crises

कोविड संकट काळात सोशल नेटवर्किंग फोरमच्या हाकेला धावून येणारे देवदूत

Efforts made by SNF on Covid war front in rural & tribal areas.

SNF Social Networking Forum

महेश चंद्रात्रे
डॉ. प्रणोती कावडे
संदीप मांडवडे
मधुकर कापडणीस
कमलेश शेवरे
किरण गीते
डॉ.सोमेश्वर झाडबुके
वैभव तुपे
मनोज दामले
सचिन गोसावी
कर्नल प्रसाद कदम
प्रदीप जोहर
डॉ. वैशाली पवार
जीवन सोनवणे
भाऊसाहेब महाजन
देबश्री दत्ता
डॉ. रुमी पटेल

गिरीश परंडकर
राहुल खुटाडे
सारिका देवरे
नितीनचंद्र गणेश
मृणाली शहा
मनीष पाटील
वैशाली पवार
मुनिर कलावंत
विजय लोहारकर
विजय भरसट
प्रकाश मिश्रा
बागुल हॉस्पिटल
दीपक वाघ
डॉ. शीतल आव्हाड
किरण पाटील
अरविंद कुलकर्णी
दिनेश जोशी

सारंग भंडारी
अभिजित श्रीरंग
संजय बागुल
कर्नल राजेश कुलकर्णी
मंजू अशोकजी
डॉ. तुषार नेमाडे
दीपक बिरारी
भूषण पंचभाई
अंबादास शिंदे
रजनी गायकवाड
लक्ष्मीकांत देशमुख
एस आणि फीड्स
प्रशांत गायकवाड
भूषण महाजन
डॉ. संगीता मखारिया
वैशाली सावंत
वैभवी इंगोले

राहुल सोनवणी
मुकूंद कोतवाल
कर्नल अमित दळवी
सारंग माळी
राजेश जाधव
वैशाली कुलकर्णी
डॉ.आशिष चौरसिया
तुषार पगार
राहुल जिंदे
हनुमंत निकाळजे
यशश्री मॅडम
गणेश कोठावदे
सतीश दाणी
जलपरिषद मित्र परिवार
शर्मिला चव्हाण
प्रशांत गायकवाड
विजय निकुंभ

डॉ. सरला सोहनंदानी
प्रसाद देशमुख
डॉ. प्रकाश गोसावी
विलास पाटील
अमोल जाधव
हरिदास मोरे
आयपीएस तुषार दोषी
रमेश शिरसाठ
संजय निकम
राजेश कुलकर्णी
मंगेश गुरव
श्रेणीक पाटील
संजय बोरकर
चंद्रशेखर महाले
डॉ. उमाकांत सोनवणे
निलेश चांडक
शिरीष इंगवले

डॉ.सचिन गवळे
डॉ. विक्रांत वाघ
डॉ.अलका मडके
रोहन बक्षी
स्वाती कुर्हाडे वैशाली महाले
अमोद पाटील
विकास राठोड
डॉ. अलका मांडके
हर्षल सोनवणे
सतीश मुजुमदार
योगेश डागा
रश्मी जोशी
घनश्याम महाले
संगीता माखरिया
प्रमोद भदाणे
शरद ठोंबरे
विनय हिंगे

लोकप्रतिनिधी आणि शासकीय अधिकाऱ्यांचे सहकार्य

मा.ना.नरहरी झिरवाळ साहेब,
विधानसभा अध्यक्ष

श्री. नितीन मुंडावरे,
उपजिल्हाधिकारी, नाशिक

श्री. नितीन निंबा मैंद,
विभागीय अधिकारी, राज्य परिवहन

डॉ. संदीप आहेर, प्रांताधिकारी

श्री. पंकज पवार,
तहसीलदार, तहसील कार्यालय दिंडोरी

श्री. चंद्रकांत भावसार,
गटविकास अधिकारी, पं. स., दिंडोरी

श्री. भास्कर कनोज
गटशिक्षणाधिकारी, पं. स., दिंडोरी

डॉ. सुजित कोशिरे
तालुका वैद्य. अधिकारी, पं. स., दिंडोरी

श्रीमती बेबीताई गांगुर्डे
सामाजिक कार्यकर्ती, वणी ता. दिंडोरी

श्री.गंगाधर निखाडे, सरपंच ओझरखेड

श्री. सचिन वडजे, जिल्हाध्यक्ष DCPS

श्री.विलास ढाकणे, पत्रकार

श्री. अनंत तारगे
पोलीस निरिक्षक दिंडोरी पोलीस स्टेशन

श्री. संजय बनकर, CDPO, प.स.दिंडोरी

संदिप भोसले, तहसीलदार, पेठ

नम्रता जगताप, गटविकास अधि.पं. स., पेठ

सरोज जगताप,
गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पेठ

डॉ. योगेश मोरे,
तालुका वैद्य. अधिकारी, पं. स. पेठ

श्री. भास्कर गावीत
जि.प. सदस्य राजबारी ता. पेठ

श्री. विलास अलबाड
सभापती पंचायत समिती पेठ

श्री. मनोज घोंगे
नगराध्यक्ष पेठ नगरपंचायत पेठ

श्री. महेश टोपले, मोहपाडा ता. पेठ

श्री. कमलेश वाघमारे
सामाजिक कार्यकर्ता करंजखेड, ता. पेठ

श्री. रामेश्वर गाडे,
पोलीस निरिक्षक पेठ पोलीस स्टेशन

श्री. अरविंद पगारे
तालुका कृषी अधिकारी, कार्यालय पेठ

डॉ. प्रमोद शिंदे

SNF
Social Networking Forum

Spreading Joy Hope
Bringing thousands of Smiles...

Efforts made by SNF on Covid war front in rural & tribal areas.

Social Networking Forum

3rd Floor, Vitthal Charani Sankul, Off Big Bazaar,
College Road, Nashik, Maharashtra- 422005 (INDIA)
Phone No. : (+91) 0253-2582930
Mobile No. : (+91) 94227 69364
Website : www.socialforumindia.com
Email : socialforum10@gmail.com